# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/३७५ दिनांक : २८/०३/२०१८

तातडीचे व महत्वाचे

प्रति,

मा. प्राचार्य,

नाशिक जिल्हयातील सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये

विषयः— सादर केलेल्या स्वमूल्यमापन अहवालाबाबत...

संदर्भः— या विभागाचे पत्र क्र. सीए/ २१७२, दि. १२ डिसेंबर, २०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांनी 'स्वमूल्यमापन अहवाल' दि. ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत शैक्षणिक विभागात सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. त्यानुसार आपल्या महाविद्यालयांची माहिती शैक्षणिक विभागास प्राप्त झाली. तथापि सदर माहितीची शहानिशा केली असता त्यामध्ये प्रामुख्याने खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१. 'स्वमूल्यमापन अहवाल' (SAR) मधील माहिती अपूर्ण असून विशेषत: रकाना क्र. ९ मधील (Approved/Not Approved Teachers Details) माहिती अपूर्ण आहे.
२. बऱ्याच महाविद्यालयांनी SAR सादर केले नाहीत. ज्या महाविद्यालयांनी SAR सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१७—१८ व २०१८—१९ करीता संलग्नीकरण देता येणार नाही. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८—१९ साठी अशी महाविद्यालये प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यास पात्र ठरणार नाही.
३. 'स्वमूल्यमापन अहवाला' मध्ये अभ्यासक्रमनिहाय, तुकडीनिहाय व अनुदानित/विनाअनुदानित शिक्षकांची माहिती दिलेली नाही.
४. प्राचार्य/संचालक/शिक्षकांच्या विद्यापीठ मान्यतेविषयी माहिती सदोष/अपूर्ण आढळून आली आहे.
५. एकाच अध्यापकाचे नाव एकाहून अधिक अभ्यासक्रमांसाठी दर्शविलेले आहे.
६. काही शिक्षकांची मान्यतापत्रे ते पूर्वी कार्यरत असलेल्या महाविद्यालयांची आहेत.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त दर्शवलेल्या त्रुटींची पूर्तता करून सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा कार्यालय अधीक्षक, ज्यांना स्वमूल्यमापन अहवालाबाबतची संपूर्ण माहिती अवगत आहे यांनी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. तसेच शैक्षणिक विभागाकडे स्वमूल्यमापन अहवालाची माहिती सादर केलेल्या संबंधित जबाबदार व्यक्तीने खालील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकास व वेळेनुसार **मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. कॉलेज, गंगापूर रोड, नाशिक–४२२ ००२** येथे उपस्थित रहावे.

तसेच संबंधित अभ्यासक्रमास शासनाची व विद्यापीठाची मान्यतापत्रे, कार्यभाराची प्रत (Workload), शिक्षकांच्या विद्यापीठ मान्यतेची पत्रे व इतर आवश्यक ती सर्व कागदपत्रे सोबत आणावीत.

| अ.क्र. | तालुका | वार व दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | नाशिक शहर, इगतपुरी, कळवण, चांदवड, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी | गुरूवार, दि. १२ एप्रिल, २०१८ | सकाळी ११.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.०० |
| २. | देवळा, नांदगाव, निफाड, बागलाण, मालेगाव, येवला, सिन्नर, सुरगाणा | शुक्रवार, दि. १३ एप्रिल, २०१८ | सकाळी ११.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.०० |
| ३. | स्वर्गीय संजीभाई रूपजीभाई मेमोरिअल ट्रस्टचे एस.एस. आर. कालेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, संजीभाई देलकर मार्ग, सायली–सिल्वासा, दादरा नगर हवेली–३९६ २३०, | शुक्रवार, दि. १३ एप्रिल, २०१८ | सकाळी ११.०० ते २.०० |

कळावे,

आपला,

22/3/18

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)